**पुरावा सुरू होण्याची वेळ – दुपारी १२.०० वाजता.**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५**

सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नांवः **गणेश रघुनाथ घुले,**

वयः– ३५ वर्षे, व्यवसायः– नोकरी,

राहणारः शिर्डी पोलीस स्टेशन, ता. राहता, जि. अहमदनगर.

-----------------------------------------

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. डी. एम. ठाकुर यांचेकडूनः–**

१. सन २०२३ मध्ये मी संगमनेर पोलीस ठाण्यात पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कार्यरत होतो. दिनांक १६.०६.२०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजता भारतीय जनता पार्टीने आयोजीत केलेल्या आंदोलनाच्या ठिकाणी म्हणजेच जाणता राजा मैदान, संगमनेर येथे नेमणूक होती. मी बंदोबस्तासाठी हजर होतो. दिनांक ०६.०६.२०२३ रोजी सकल हिंदु समाज यांचा आपमान झाल्यामुळे व विधान देणारे आमदार बाळासाहेब थोरात यांचा निषेध नोंदविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्यावतीने भाजपा शहर अध्यक्ष श्रीराम गणपुले यांनी जाणता राजा मैदान येथून नियोजीत मार्गाने संगमनेर बसस्थानकापर्यंत निषेध मोर्चा व बैठे आंदोलनाची परवानगी मिळावी म्हणून दिनांक १४.०६.२०२३ रोजी पोलीस ठाण्यात लेखी अर्ज देण्यास कळविले होते.

२. सदरील मार्ग हा कॉंग्रेसचे आमदार बाळासाहेब थोरात यांच्या ठिकाणाच्या समोरून जाणारा मार्ग निवडला होता. त्यावरून भाजपचे कार्यकर्ते व कॉंग्रेसचे कार्यकर्ते यांच्या वाद निर्माण झाले असते म्हणून पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कायदा व सुव्यवस्था आदेशानुसार दिनांक ०८.०६.२०२३ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेच्या स्थितीवरून कोणत्याही मोर्चास परवानगी देण्यात येऊ नये असे आदेश पारीत झाले होते. त्यावरून अर्जदार यांना तोंडी कळविले की, परवानगी देता येणार नाही. दिनांक १५.०६.२०२३ रोजी पोलीस निरिक्षक भगवान मथुरे व उप विभागीय पोलीस अधिकारी, संगमनेर विभाग यांनी आयोजकासोबत चर्चा

केली व त्यांना आंदोलनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलक हे त्यांच्या आंदोलनावर ठाम होते. संगमनेर येथे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून सदर निषेध मोर्चास परवानगी नाकारल्याचे लेखी पत्र सी. आर. पी. सी. १४९ कलमान्वये पोसई यादव यांनी त्यांचा मोबाईल क्र. ९८८१७३६२०४ या वरून आयोजक श्रीराम गणपुले यांचा मोबाईल क्र. ९४०३८००६४८ वर व्हाट्सअॅपवर नोटीस दिली.

३. त्यानंतर आंदोलकांनी वरिष्ठ अधिका–यांशी चर्चा केली. नियोजीत मोर्चा रद्द करून ११.१० वाजता आंदोलकांनी ठिया आंदोलन चालू केले. ठिया म्हणजे जागेवरच घोषणाबाजी करणे. त्यांनी आमदार बाळासाहेब थोरात यांच्या निषेधाचे फलक हातात धरून घोषणाबाजी केली. तसेच तालुका अध्यक्ष सतिष कानवडे, डॉ. अशोक इथापे, अमोल खताळ, वैभव लांडगे, भिमराज चत्तर, भरत फटांगरे, श्रीराम गणपुले, दिनेश सोमाणी, राहूल भोईर, हरिश्चंद्र चकोर व इतर प्रमुख नेत्यांनी भाषणे करून निषेध व्यक्त केला. मागणीचे निवेदन पोलीस निरिक्षक भगवान मथुरे यांच्याकडे देण्यात आले. तेथे अंदाजे ३५ ते ४० कार्यकर्ते सहभागी झाले आहे. आंदोलन संपत येत असतांना पाठीमागुन प्लॅस्टीकच्या पाईपमध्ये रिकामे बारदाण व त्यावर आमदार बाळासाहेब थोरात यांचे कलर झेरॉक्स केलेले फोटो चिकटविलेल्या कागदावर सदर आंदोलकांनी काळी शाई टाकून निषेध केला. प्रतिबंधात्मक आदेश लागू असतांना की जो दिनांक ०५.०६.२०२३ ते दिनांक १९.०६.२०२३ पर्यंत लागू होता. व्यक्तीच्या आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यास मनाई असतांना आम्ही प्रसिध्दी माध्यमाव्दारे माहिती प्रसिध्द केली असतांना दिनांक १६.०६.२०२३ रोजी सकाळी ११.१० ते १२.१० च्या दरम्यान जाणता राजा मैदान, संगमनेर येथे भारतीय जनता पार्टीचे शहर अध्यक्ष श्रीराम अरविंद गणपुले यांच्या नेतृत्वाखाली वर नमूद व्यक्तींशिवाय, दादाभाऊ गुंजाळ, राजेंद्र सांगळे, अजय पठाडे, संदिप देखमुख, शैलेश फटांगरे, सोमनाथ कानवडे, शंकर वाळे व इतर १० ते १२ कार्यकर्ते मोर्चास परवानगी नसतांना बेकायदेशीर जमाव जमवून आमदार बाळासाहेब थोरात यांच्या कलर झेरॉक्स

फोटोवर काळी शाई टाकुन निषेध व्यक्त केला. त्यामुळे आरोपींनी आदेशाचा भंग केला. पोलीस सचिन यांनी फिर्याद दिली. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. आरोपींना माझ्या समक्ष आणलेतर मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाहीत. घटनेच्या दरम्यान फोटो काढण्यात आले होते.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी क्र. १,२, ५ ते १९ तर्फे विधीज्ञ श्री. ए. बी. व्यवहारे यांचेमार्फत–**

४. हे म्हणणे खरे आहे की, श्रीराम गणपुले यांनी माझ्यासमक्ष अर्ज दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, श्रीराम गणपुले यांच्याशी चर्चा करून त्यांना मोर्चाची परवानगी नाकारल्याची घटना माझ्या समक्ष झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मोर्चाची परवानगी नाकारल्याचे श्रीराम गणपुले यांना लेखी कळविण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिबंधात्मक आदेश कोणत्या वर्तमानपत्रात कोणत्या तारखेला प्रसिध्द झाले होते हे मला सांगता येत नाही. हे मला माहित नाही की, बाळासाहेब थोरात हे घटनेच्यावेळी अहमदनगर जिल्हयाचे पालकमंत्री देखील होते.

५. हे म्हणणे खरे आहे की, मोर्चाच्या ठिकाणी पाईप कोणी आणला, त्याला बारदाणा कोणी बांधला व त्यावर शाई कोणी फेकली त्या व्यक्तींची नावे मी वैयक्तीकरित्या सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ वरिष्ठांच्या सांगण्यावरून कोणत्याही घटनेचे साक्षीदार नसतांना मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे विधीज्ञ श्रीमती एस. एस. मांढरे यांचेमार्फत–**

६. हे म्हणणे खरे आहे की, संगमनेर येथे थोरात आणि विखे पाटील यांच्यात बरेच वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना वैयक्तीकरित्या ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजकीय दबावापोटी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे विधीज्ञ श्री. ए. ए. महांडुळे यांचेमार्फत–**

७. हे म्हणणे खरे नाही की, जाणता राजा मैदान हे वर्दळीचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या आसपास घरे व दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, एकही आरोपी घटनास्थळी हजर नसतांना राजकीय दबावापोटी मी खोटी साक्ष देत

आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात संपुर्ण खोटा मजकुर नमूद केला आहे.

उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Digitally signed by GAJANAN GULABCHAND SONI
Date: 2026.05.26 15:36:53 +0530

(जी. जी. सोनी)

अति.मुख्य न्यादंडाधिकारी,न्या.क्र.१०,

अहमदनगर.

समक्ष

Digitally signed by GAJANAN GULABCHAND SONI
Date: 2026.05.26 15:37:05 +0530

(जी. जी. सोनी)

अति.मुख्य न्यादंडाधिकारी,न्या.क्र.१०,

अहमदनगर.

दिनांकः २६/०५/२०२६

**पुरावा संपण्याची वेळ – १२.३६ वाजेपर्यंत.**

**कोर्ट नोट– व्ही.सी.गुगलच्या सहाय्याने पुरावा नोंदविण्यात आला व व्हीडिओ फाईल डाऊनलोड फोल्डरमध्ये जतन करून ठेवण्यात आली.**